## MAHARASHTRA ACT No. XIII OF 1992

## THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS AND CITY OF NAGPUR CORPORATION (AMENDMENT) ACT, 1992.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक ७ मे १९९२, रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

डी. एन. चौधरी,
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग

## MAHARASHTRA ACT No. XIII OF 1992

AND ACT FURTHER TO AMEND THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATION ACT, 1949. AND THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948.

[राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक ११ मे १९९२, रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला].

## सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ व नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ यांत आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चा १९४९ व नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ यांत आणखी सुधारणा करणे इष्ट आहे;
मुंबई ५९. त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या त्रेचाळिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात
१९५० चा येत आहे :—
मध्यप्रांत व
वऱ्हाड २.

१. (१) या अधिनियमास, मुंबई प्रांतिक महानगरपालिका व नागपूर शहर महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९९२ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा दिनांकाला अंमलात येईल; आणि या अधिनियमाच्या निरनिराळ्या तरतुदींसाठी निरनिराळे दिनांक नेमून देता येतील.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ६६ ची सुधारणा.

२. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (यात यापुढे ज्याचा निर्देश "प्रांतिक महानगरपालिका अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ६६ च्या खंड (८) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

१९४९ चा मुंबई ५९.

"(८अ) महानगरपालिकेकडे निहित असलेल्या कोणत्याही सार्वजनिक रस्त्याच्या किंवा सार्वजनिक जागेच्या कोणत्याही भागात वाहने उभी करून ठेवण्याच्या किंवा थांबविण्याच्या जागा किंवा ठिकाणे यांची तरतूद करणे;".

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ यात शीर्षक व कलम २४३ अ समाविष्ट करणे.

३. प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २४३ नंतर पुढील शीर्ष व कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"वाहने उभी करून ठेवण्याच्या किंवा थांबविण्याच्या जागा किंवा ठिकाणे यांसाठी करावयाची तरतूद.

वाहने उभी करून ठेवण्याच्या किंवा थांबविण्याच्या जागा किंवा ठिकाणे व त्संबंधातील फी किंवा शुल्क यांसाठी करावयाची तरतूद.

२४३अ. (१) आयुक्तास, पोलीस आयुक्ताशी किंवा पोलीस आयुक्त नसेल त्याबाबतीत महापालिका क्षेत्रातील पोलीस अधिकाऱ्यांच्या अधिकारश्रेणीमध्ये सर्वात वरिष्ठ दर्जा असणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याशी विचारविनिमय केल्यानंतर, वेळोवेळी, सार्वजनिक रस्त्याच्या किंवा सार्वजनिक जागेच्या कोणत्याही भागामध्ये त्याला योग्य वाटतील अशा जागी वाहने उभी करून ठेवण्याच्या किंवा थांबविण्याच्या जागा किंवा ठिकाणे म्हणून राखून ठेवता येतील.

(२) आयुक्तास, महानगरपालिकेच्या संमतीने, त्याला योग्य वाटतील अशा अटी व शर्ती यांच्या अधीन राहून, कोणत्याही व्यक्तीकडून, तिने वाहन उभे करून ठेवण्यासाठी किंवा थांबविण्यासाठी अशा जागेच्या किंवा ठिकाणाच्या केलेल्या वापराकरता प्रत्येक दिवसासाठी किंवा त्याच्या भागासाठी त्याला योग्य वाटेल अशी फी किंवा शुल्क आकारता येईल.".

सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ५८ ची सुधारणा.

४. नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (यात यापुढे ज्याचा निर्देश "नागपूर महानगरपालिका अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ५८ मध्ये, खंड (ड) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

१९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड २.

"(डअ) महानगरपालिकेकडे निहित असलेल्या कोणत्याही सार्वजनिक रस्त्याच्या किंवा सार्वजनिक जागेच्या कोणत्याही भागात वाहने उभी करून ठेवण्याच्या किंवा थांबविण्याच्या जागा किंवा ठिकाणे यांची तरतूद करणे;".

२०२

५. नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या प्रकरण सातच्या शीर्षकाऐवजी पुढील शीर्षक दाखल करण्यात येईल :— सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या प्रकरण सातच्या शीर्षकाऐवजी नवीन शीर्षक दाखल करणे.

" महानगरपालिका निधी व इतर निधी
महानगरपालिका निधी ".

६. नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ७७ ऐवजी पुढील कलम दाखल करण्यात येईल :— सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ७७ ऐवजी नवीन कलम दाखल करणे.

" ७७. कलमे ८३-अ व ८३-ब च्या तरतुदींस अधीन राहून, एक महानगरपालिका निधी असेल; व तो या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, विश्वस्तव्यवस्था, म्हणून धारण करण्यात येईल.". महानगरपालिका निधी विश्वस्तव्यवस्था म्हणून धारण करणे.

७. नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ७८, पोट-कलम (१) मध्ये, " महानगरपालिका निधीमध्ये " या मजकुरापूर्वी, " कलमे ८३-अ व ८३-ब च्या तरतुदींस अधीन राहून, " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ७८ ची सुधारणा.

सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ मध्ये उपशीर्षकासह कलमे ८३-अ व ८३-ब समाविष्ट करणे.

८. नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ८३ नंतर पुढील उपशीर्षक व कलमे समाविष्ट करण्यात येतील :—

"विशेष निधी.

एकत्रीकृत मलजल विल्हेवाट व पाणीपुरवठा कर्जनिधी स्थापन करणे.

८३ अ. (१) प्रकरण क्रमांक तेरा, चौदा, सोळा व सतरा यांच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनासाठी महानगरपालिका 'एकत्रिकृत मलजल विल्हेवाट व पाणीपुरवठा कर्जनिधी, या नावाचा एक स्वतंत्र निधी स्थापन करील व तो वेगळा ठेवील.

(२) उक्त कर्ज निधीमध्ये पुढील पैसा जमा करण्यात येईल :—

(अ) प्रकरण क्रमांक तेरा, चौदा, सोळा व सतरा यांच्या प्रयोजनांसाठी, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून कर्जाऊ घेतलेल्या कोणत्याही रकमा;

(ब) महानगरपालिका वेळोवेळी निर्धारित करील असा, कलम ९७ मध्ये निर्दिष्ट केलेल्या कर्जनिवारण निधीचा भाग.

(३) अशा प्रकारे स्थापन करण्यात आलेल्या निधीचा वापर पुढील प्रयोजनांसाठी करण्यात येईल :—

(अ) प्रकरणे तेरा, चौदा, सोळा व सतरा यांच्या प्रयोजनांसाठी भांडवली बांधकामावर होणारा खर्च;

(ब) अशा भांडवली बांधकामासाठी उभारण्यात आलेल्या पूर्वीच्या कर्जाची परतफेड करणे.

(४) पोट-कलम (३) अनुसार वापरण्यात न आलेला किंवा तावडतोब वापरण्यात न यावयाचा उक्त निधीमधील कोणताही पैसा, आयुक्त, महानगरपालिकेच्या वतीने व स्थायी समितीच्या मंजुरीने, त्यास योग्य व उचित वाटेल अशा रीतीने गुंतवील.

मलजल व जल निधीची स्थापना.

८३ ब. (१) महानगरपालिका "मलजल व जल निधी" या नावाने संबोधण्यात यावयाचा एक स्वतंत्र निधी स्थापन करून तो वेगळा ठेवील.

(२) कलम ११५ अ च्या खंड (अ) व (ब) अन्वये महानगरपालिकेकडून किंवा महानगरपालिकेच्या वतीने मिळणारा सर्व पैसा किंवा प्रकरणे तेरा, चौदा, सोळा व सतरा यांच्या प्रयोजनांसाठी मिळालेला इतर कोणताही पैसा मलजल व जल निधीमध्ये जमा करण्यात येईल.

(३) उक्त निधीच्या खात्यावर जमा करावयाचा सर्व पैसा आयुक्त घेईल व तो, या बाबतीत स्थायी समितीने वेळोवेळी मान्यता दिलेल्या बँकेत किंवा बँकामध्ये 'मलजल व जल निधी खाते' या नावाने ओळखण्यात यावयाच्या खात्यावर तो तावडतोब जमा करील :

परंतु, प्रकरणे तेरा, चौदा, सोळा व सतरा यांच्या प्रयोजनांकरिता आवश्यक असेल एवढी रोख शिल्लक रक्कम आयुक्ताला ठेवून घेता येईल.

(४) उक्त निधीमध्ये वेळोवेळी जमा करण्यात आलेला पैसा, प्रकरणे तेरा, चौदा, सोळा व सतरा यांच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असतील अशा रकमा, आकार व खर्च देण्यासाठीच केवळ वापरण्यात येईल.

(५) उक्त निधीमध्ये जमा खाती असलेला व पोट-कलम (४) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे ताबडतोब, किंवा नजिकच्या भविष्यकाळांत वापरला जाण्याची शक्यता नसलेला जादा पैसा, आयुक्तास, वेळोवेळी स्थायी समितीने मान्यता दिलेल्या बँकेत किंवा बँकांमध्ये व्याजाने जमा करता येईल किंवा सार्वजनिक रोख्यांमध्ये गुंतविता येईल.

(६) आयुक्त, अशा सर्व ठेवी व गुंतवणुका महानगरपालिकेच्या वतीने व स्थायी समितीच्या मंजुरीने ठेवील व करील व तशाच मंजुरीने आयुक्तास, कोणत्याही वेळी, अशा प्रकारे ठेवलेल्या कोणत्याही ठेवी काढून घेता येतील किंवा कोणत्याही रोख्यांची विक्री करता येईल व अशा प्रकारे काढून घेतलेला पैसा किंवा रोख्यांच्या विक्रीमधून मिळालेला पैसा पुन्हा ठेव म्हणून ठेवता येईल किंवा पुन्हा गुंतवता येईल; मात्र, अशी कोणतीही ठेव ठेवणे किंवा गुंतवणूक करणे किंवा ठेव काढून घेणे किंवा रोख्यांची विक्री करणे यासंबंधातील कोणताही आदेश लेखी असल्याशिवाय व कलम ८१ अन्वये धनादेशांवर सही करण्यासंबंधात जी रीत विहित करण्यात आली आहे त्या रीतीने त्यावर सही केलेली असल्याखेरीज त्यास कोणतीही विधिग्राह्यता असणार नाही.

(७) अशा कोणत्याही ठेवीमुळे किंवा गुंतवणुकीमुळे कोणताही तोटा उद्‌भवत असल्यास तो "मलजल व जल निधी" याखाली खर्चखाती टाकण्यात येईल.".

९. नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ८४ मध्ये, "महानगरपालिका निधीतून" व "महानगरपालिका निधीमधून" या मजकुरानंतर, "किंवा विशेष निधीमधून" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ८४ ची सुधारणा.

१०. नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ८६ मध्ये,— सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ८६ ची सुधारणा.

(अ) पोट-कलम (१) मध्ये, "महानगरपालिका निधीचे" या मजकुरानंतर "आणि तसेच विशेष निधीचे" हा मजकूर व "अर्थसंकल्पीय अंदाज" या मजकुरानंतर, "स्वतंत्ररीत्या" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ब) पोट-कलम (२) मध्ये, खंड (क) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल:—

"(कअ) विशेष निधींच्या बाबतीत,—

(एक) प्रकरण अकराच्या तरतुदींच्या संदर्भात, प्रकरणे तेरा, चौदा, सोळा व सतरा यांच्या प्रयोजनार्थ, आयुक्ताला योग्य वाटतील अशा महानगरपालिका करांचे म्हणजेच मलजल कर, मलजल लाभ कर, पाणीपट्टी व पाणीलाभ कर यांचे दर व त्यांच्या मर्यादा यांची तरतुद करण्यात येईल;

(दोन) पूर्वोक्त कराच्या जमा रकमेचा किंवा इतर कोणत्याही जमा रकमांचा अंदाज नमूद करण्यात येईल ;

(तीन) प्रकरणे तेरा, चौदा, सोळा व सतरा यांखालील बाबींच्या संबंधात, या अधिनियमान्वये महानगरपालिका ज्यासाठी बाधी असेल अशा सर्व रकमा आणि मुद्दल व व्याज यांचे सर्व हप्ते हे जेव्हा देय होतील तेव्हा त्यांच्या प्रदानासाठी तरतूद करण्यात येईल; आणि

(चार) आयुक्ताला प्रकरणे तेरा, चौदा, सोळा व सतरा यांच्या प्रयोजनार्थ, नंतरच्या वित्तीय वर्षात महानगरपालिकेने जो खर्च करणे आवश्यक वाटेल असा कोणताही खर्च असेल तर त्यासाठी तरतूद करण्यात येईल ;".

२००

सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ११४ ची सुधारणा.

**११.** नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ११४ मध्ये, पोट-कलम (१) मध्ये,—

(अ) खंड (अ) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(अ) मालमत्ता कर;";

(ब) खंड (ब), (क) व (ड) वगळण्यात येतील.

सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ११५ नंतरच्या उप शीर्षकाची सुधारणा.

**१२.** नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या इंग्रजी मजकुरात कलम ११५ नंतर उपशीर्षामध्ये ज्या दोन ठिकाणी "Tax" हा शब्द येतो त्या दोन्ही ठिकाणी त्याऐवजी "Taxes" हा शब्द दाखल करण्यात येईल. (उक्त अधिनियमाच्या मराठी आवृत्तीत ही सुधारणा आवश्यक नाही.)

सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ यामध्ये कलमे ११५ अ, ११५ ब व ११५ क समाविष्ट करणे.

**१३.** नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ११५ नंतर, उपशीर्षकाखाली पुढील कलमे समाविष्ट करण्यात येतील :—

मालमत्ता करांमध्ये समाविष्ट असलेले कर व ते ज्या दराने बसवावयाचे तो दर.

"**११५अ.** शहरातील इमारती व जमिनी यांवर पुढील कर बसविण्यात येतील व त्यांना "मालमत्ता कर" असे संबोधण्यात येईल :—

(अ) (एक) मानवी मलमूत्र व इतर कचरा गोळा करणे, तो हलविणे व त्याची विल्हेवाट लावणे यासाठी महानगरपालिकेला आवश्यक वाटेल त्या प्रमाणे त्यांच्या वार्षिक मूल्याच्या तितके टक्के दराने मलजल कर;

(दोन) मानवी मलमूत्र व इतर कचरा गोळा करणे, तो हलविणे व त्याची विल्हेवाट लावणे यासंबंधातील सुविधांची तरतूद करण्यासाठीच्या व त्यांमध्ये सुधारणा करण्यासाठीच्या भांडवली बांधकामावर आणि अशा बांधकामाचे परिरक्षण व उपयोग करणे यांवर केलेला किंवा करावा लागणारा संपूर्ण अथवा अंशतः खर्च भागविण्यासाठी महानगरपालिकेला आवश्यक वाटेल त्याप्रमाणे त्यांच्या वार्षिक मूल्याच्या तितके टक्के दराने "मलजल लाभ कर" म्हणून संबोधण्यात येणारा अतिरिक्त मलजल कर;

(ब) (एक) पाणीपुरवठ्याची तरतूद करण्यासाठी महानगरपालिकेला आवश्यक वाटेल त्या प्रमाणे त्यांच्या वार्षिक मूल्याच्या तितके टक्के दराने पाणीपट्टी;

(दोन) पाणीपुरवठ्याच्या सुविधांची तरतूद करण्यासाठीच्या व त्यांमध्ये सुधारणा करण्यासाठीच्या भांडवली बांधकामावर आणि अशा बांधकामाचे परिरक्षण व उपयोग करणे यांवर केलेला किंवा करावा लागणारा संपूर्ण किंवा अंशत: खर्च भागविण्यासाठी महानगरपालिकेला आवश्यक वाटेल त्याप्रमाणे त्यांच्या वार्षिक मूल्याच्या तितके टक्के दराने "पाणी लाभ कर" म्हणून संबोधण्यात येणारी अतिरिक्त पाणीपट्टी;

(क) या प्रकरणान्वये निर्धारित करण्यात आलेल्या वार्षिक मूल्यांकनाच्या बारा टक्क्यांहून कमी नसेल एवढा सर्वसाधारण कर.

११५ब. (१) मलजल कर केवळ पुढील मालमत्तांच्या बाबतीत बसविण्यात येईल.— मलजल कर कोणत्या मालमत्तांवर बसविण्यात येईल.

(अ) आयुक्तांनी शहराच्या ज्या भागात, संडास, मुताऱ्या व मलकुंड्या यांमधील सर्व विष्ठा व दूषित पदार्थ गोळा करण्याचे, ते हलविण्याचे व त्यांची विल्हेवाट लावण्याचे काम महानगरपालिका अभिकरणाकडून करण्यात येईल अशी जाहीर सूचना लावली असेल त्या कोणत्याही भागात असलेल्या मालमत्ता; किंवा

(ब) कोणत्याही ठिकाणच्या ज्या मालमत्तेत, संडास, शौचकूप, मलकुंडी, मुतारी, स्नानगृह किंवा स्वयंपाकाची जागा नालीद्वारे महानगरपालिकेच्या नालीला जोडलेली असेल अशी मालमत्ता :

परंतु असे की, आयुक्तांच्या मते, ज्या परिवास्तूत किंवा परिवस्तूवर, पूर्वोक्त असे कोणतेही पदार्थ साचत नसतील किंवा टाकण्यात येत नसतील अशा, खंड (अ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या, शहरातील कोणत्याही भागात असलेल्या कोणत्याही परिवास्तूच्या संबंधात उक्त कर लागू होणार नाही.

(२) मलजल लाभ कर हा शहरातील सर्व परिवास्तूंच्या संबंधात आकारण्यात येईल.

११५क. (१) कलम २२० च्या तरतुदींना अधीन राहून, केवळ पुढील मालमत्तांच्या संबंधात पाणीपट्टी बसविण्यात येईल :— पाणीपट्टी कोणत्या मालमत्तांवर बसविण्यात येईल.

(अ) ज्या मालमत्तांना महानगरपालिकेच्या कोणत्याही जलदाय व्यवस्था केंद्राकडून खाजगी पाणीपुरवठा करण्यात येत असेल किंवा ज्या मालमत्ता जलवाहिन्याद्वारे महानगरपालिकेच्या कोणत्याही जलदाय व्यवस्था केंद्राला जोडण्यात आल्या असतील; किंवा

(ब) शहराच्या ज्या भागात आयुक्तांनी अशी जाहीर सूचना लावली असेल की, उक्त भागातील सर्व परिवास्तूंना वाजवी पाणीपुरवठा करण्यासाठी महानगरपालिकेच्या जलदाय व्यवस्था केंद्रांमधून पुरेसे पाणी उपलब्ध होईल, त्या भागात असलेल्या मालमत्ता.

(२) कलम २२० च्या तरतुदींना अधीन राहून, शहरातील सर्व परिवास्तूंच्या संबंधात पाणी लाभ कर बसविण्यात येईल.".

१४. नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ११६ मधील,— सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ११६ ची सुधारणा.

(अ) पोट-कलम (१) मध्ये, "या प्रकरणाद्वारे निर्धारित करण्यात आलेल्या वार्षिक मूल्यांकनाच्या ६¼ टक्क्यांपेक्षा कमी नसेल इतका मालमत्ता कर" या मजकुराऐवजी "सर्वसाधारण कर" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ब) पोट-कलम (३) मध्ये, "मालमत्ता करांतून" या मजकुराऐवजी "सर्वसाधारण करातून" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(क) पोट-कलम (४) मध्ये, "मालमत्ता कराचा" आणि "मालमत्ता कराचे" हा मजकूर ज्या ज्या ठिकाणी येईल तेथे तेथे अनुक्रमे "सर्वसाधारण कराचा" आणि "सर्वसाधारण कराचे" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ड) समासटीपेऐवजी, पुढील समासटीप दाखल करण्यात येईल :—

"सर्वसाधारण कर कोणत्या मालमत्तांवर बसवावयाचा.".

सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ११७ ची सुधारणा.

१५. नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ११७ मध्ये,—

(अ) पोट-कलम (१) मधील, "मालमत्ता कराऐवजी" या मजकुराऐवजी "सर्वसाधारण कराऐवजी" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ब) पोट-कलम (२) मधील, "जो मालमत्ता कर" आणि ", तोवर मालमत्ता कर" या मजकुराऐवजी अनुक्रमे "सर्वसाधारण कर" आणि "तोवर सर्वसाधारण कर" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(क) समासटीपेतील, "मालमत्ता कराची" या मजकुराऐवजी "सर्वसाधारण कराची" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ११८ ची सुधारणा.

१६. नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ११८ मध्ये समासटीपेमधील, "मालमत्ता करावरील" या मजकुराऐवजी "सर्वसाधारण करावरील" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ११९ ची सुधारणा.

१७. नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या इंग्रजी मजकुरात कलम ११९ मध्ये—

(अ) सुरुवातीच्या भागामधील "Tax" या शब्दाऐवजी "Taxes" हा शब्द दाखल करण्यात येईल. (उक्त अधिनियमाच्या मराठी आवृत्तीत ही सुधारणा आवश्यक नाही.);

(ब) खंड (क) मधील, "पाच टक्के" या मजकुराऐवजी "सव्वा आठ टक्के" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(क) परंतुकामधील, "पाच टक्के" या मजकुराऐवजी "सव्वा आठ टक्के" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १२१ ची सुधारणा.

१८. नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १२१ मध्ये, "मालमत्ता कराच्या" या मजकुराऐवजी "मालमत्ता करांच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १२२ ची सुधारणा.

१९. नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १२२ मध्ये, "बसवण्याजोगा असलेला मालमत्ता कर हा त्याच्या मालकाने भरला पाहिजे." या मजकुराऐवजी "बसवण्याजोगे असलेले मालमत्ता कर हे त्याच्या मालकाने भरले पाहिजेत." हा मजकूर दाखल करण्यात येईल.

२०. नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १२४ मध्ये, "मालमत्ता कराच्या" या मजकुराऐवजी "मालमत्ता करांच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १२४ ची सुधारणा.

२१. नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १३२ मधील, पोट-कलम (१) मध्ये,—

(अ) खंड (ई) मधील, "मालमत्ता करापोटी" या मजकुराऐवजी "मालमत्ता करांपोटी" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ब) खंड (फ) मधील, "मालमत्ता कराच्या" या मजकुराऐवजी "सर्वसाधारण करांच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १३२ ची सुधारणा.

२२. नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १३६ मधील, पोट-कलम (१) मध्ये इंग्रजी मजकुरात ज्या दोन ठिकाणी "Tax" हा शब्द येतो त्या दोन्ही ठिकाणी त्याऐवजी "Taxes" हा शब्द दाखल करण्यात येईल. (उक्त अधिनियमाच्या मराठी आवृत्तीत ही सुधारणा आवश्यक नाही.)

सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १३६ ची सुधारणा.

२३. नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १३९ मध्ये,—

(अ) "मालमत्ता कर पूर्वीच्या मूल्यांकनावर भरला पाहिजे." या मजकुराऐवजी "मालमत्ता कर पूर्वीच्या मूल्यांकनावर भरले पाहिजेत." हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ब) समासटीपमधील "मालमत्ता कराच्या" या मजकुराऐवजी "मालमत्ता करांच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १३९ ची सुधारणा.

२४. नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १४५ मधील, "मालमत्ता कराचा" या मजकुराऐवजी "मालमत्ता करांचा" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १४५ ची सुधारणा.

सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १९२ ची सुधारणा.

२५. नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १९२ मध्ये, "महानगरपालिका निधीच्या" या मजकुरानंतर "किंवा कलम ८३अ किंवा ८३ब अन्वये स्थापन केलेल्या विशेष निधींच्या" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ मध्ये उप-शीर्षक व कलम ३१० अ समाविष्ट करणे.

२६. नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३१० नंतर, पुढील उप-शीर्षक व कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"वाहने उभी करून ठेवण्याच्या किंवा थांबविण्याच्या जागा किंवा ठिकाणे यांसाठी करावयाची तरतूद

वाहने उभी करून ठेवण्याच्या किंवा थांबविण्याच्या जागा किंवा ठिकाणे व त्यासंबंधातील फी किंवा शुल्क यांसाठी करावयाची तरतूद.

३१०अ. (१) आयुक्तास, पोलीस आयुक्त, नागपूर यांच्याशी विचारविनिमय केल्यानंतर, वेळोवेळी, सार्वजनिक रस्त्याच्या किंवा सार्वजनिक जागेच्या कोणत्याही भागामध्ये त्याला योग्य वाटतील अशा जागा वाहने उभी करून ठेवण्याच्या किंवा थांबविण्याच्या जागा किंवा ठिकाणे म्हणून राखून ठेवता येतील.

(२) आयुक्तास, महानगरपालिकेच्या संमतीने, त्याला योग्य वाटतील अशा अटी व शर्ती यांच्या अधीन राहून कोणत्याही व्यक्तींकडून, तिने वाहन उभे करून ठेवण्यासाठी किंवा थांबविण्यासाठी अशा जागेच्या किंवा ठिकाणाच्या केलेल्या वापराकरिता प्रत्येक दिवसासाठी किंवा त्याच्या भागासाठी त्याला योग्य वाटेल अशी फी किंवा शुल्क आकारता येईल.".

(यथार्थ अनुवाद)

प. ग. पाटील,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.